महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ 19 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 261 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




थोडक्यात महत्वाचे

## शहापुरातील कचऱ्याचा प्रश्न बिकट !

### आराखडा तयार मात्र जमीन उपलब्ध नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर, ता. १८** तालुक्याचे झपाट्याने नागरीकरण होत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे कचरा व्यवस्थापनाच्या विविध समस्या उद्भवत आहेत. सद्यःस्थितीत तालुक्यातील २२२ गावांपैकी २०४ ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन सुरू आहे, मात्र १८ ठिकाणी जागेअभावी ही योजना रखडली आहे. त्यामुळे रस्त्यालगत साचणाऱ्या कचऱ्यामुळे रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

शहापूर तालुक्यातील वासिंद, खातिवली, कळंबे, बोरशेती, आसनगाव, वाफेगोठेघर, कसारा, चेरपोली तसेच खर्डी परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. या ग्रामपंचायतींना कचरा टाकण्यासाठीची व्यवस्थाच नसल्याने राष्ट्रीय महामार्गालगत किंवा इतरत्र टाकावा लागतो. परिणामी, दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याच्या तक्रारी आहेत. तसेच घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठीची जागाच नसल्याने प्रशासनही हतबल आहे. कचरा टाकण्यासाठी जागाच नसल्याने जवळपास १८ ग्रामपंचायतींमध्ये रस्त्यालगतच कचरा टाकला जात आहे. त्यात प्लॅस्टिकसारख्या अविघटित कचऱ्याचे प्रमाण अधिक असल्याने आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

मुंबई-नाशिक महामार्गाचे बदलले स्वरूप, समृद्धी महामार्गामुळे जमिनींचे वाढलेले भाव यामुळे खासगी जागा विकत घेणे ग्रामपंचायतींच्या आवाक्याबाहेर गेले आहे. शहापूर नगरपंचायतीने कचरा टाकण्यासाठी खासगी जमीन भाड्याने घेतल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी शिवराज गायकवाड यांनी दिली आहे, पण काही ग्रामपंचायतींपुढे मात्र कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी महसूल विभागांतर्गत खातिवली गावालगत असलेल्या गावठाण जागेत घनकचरा प्रोसेसिंग प्लॅंट व खतनिर्मिती प्रकल्प राबवण्यासंबंधी चाचपणी केली होती, मात्र परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार असल्याने खातिवली ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थांनी या प्रकल्पाला विरोध दर्शवला होता. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनासाठीच्या जागेचा प्रश्न जैसे थे आहे, तर दुसरीकडे जिंदाल कंपनीकडे घनकचरा व्यवस्थापनाचा पूर्ण आराखडा तयार आहे, पण जमीन उपलब्ध होत नसल्याने हा उपक्रम रखडल्याचे शकील शेख यांनी सांगितले.

> **घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने मोठ्या ग्रामपंचायतीमध्ये कचरा व्यवस्थापनात अडचणी आहेत. तालुक्यातील २२२ गावांपैकी २०४ ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन सुरू आहे, तर १८ ठिकाणी जागेअभावी ही योजना रखडली आहे.**
>
> **- नम्रता जगताप, गटविकास अधिकारी, शहापूर**

> **तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतीमधील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महसूल तसेच वन विभागाकडे पाठपुरावा करत आहे. शासनाने घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्याची गरज आहे.**
>
> **- पांडुरंग बरोरा, माजी आमदार, शहापूर**



# नागपूर दंगल पूर्वनियोजित कट?

## पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना सोडणार नाही, - देवेंद्र फडणवीसांचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्द्यावरुन सोमवारी नागपूरमध्ये हिंसाचार उफाळल्यानंतर आता राजकीय क्षेत्रात त्याचे पडसाद उमटत आहेत. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील आक्रमक हिंदुत्वाचे नवे आयकॉन आणि चेहरा होऊ पाहत असलेले भाजप आमदार नितेश राणे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समज दिल्याची माहिती समोर आली आहे. नितेश राणे यांनी मंगळवारी मुंबईत विधिमंडळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या दालनात जाऊन भेट घेतली. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी नितेश राणे यांना पुढील काही दिवस शांत राहण्याचे आदेश दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. देवेंद्र फडणवीस यांना भेटल्यानंतर नितेश राणे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनाही भेटले.

सोमवारी दोन गटांत निर्माण झालेल्या तणावामुळे अनेक वाहनांची जाळपोळ करण्यात आली. तसेच, या दंगलीत तब्बल ३३ पोलीस जखमी झाले असून त्यात तीन डीसीपी दर्जाचे अधिकारी असल्याची बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आज यासंदर्भात विधानसभेत केलेल्या निवेदनात अधोरेखित केली. यावेळी नागपूरमध्ये घडलेल्या दंगलीमध्ये एक सुनियोजित पॅटर्न दिसून येत असल्याचं सूचक विधान देवेंद्र फडणवीसांनी केलं.

"एकूण तीन गुन्हे गणेशपेठ पोलीस ठाण्यात दाखल झाले आहेत. तहसील पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. असे एकूण पाच गुन्हे आहेत. ११ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. एंट्री पॉइंटवर नाकाबंदी करण्यात आली आहे. त्यात तहसील, कोतवाली, गणेशपेठ, पाचपावली, लकडगंज, शांतीनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामवाडा, यशोदरानगर, कपिलनगर या पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. एसआरपीएफच्या पाच तुकड्या इथे तैनात करण्यात आल्या आहेत", असंही फडणवीसांनी नमूद केलं.

### नागपूर दंगल पूर्वनियोजित कट?

दरम्यान, नागपूरमधील प्रकार हा सुनियोजित पद्धतीने घडल्याचा दावा देवेंद्र फडणवीसांनी यावेळी केला. "सकाळची एक घटना घडल्यानंतर पूर्णपणे शांतता होती. त्यानंतर संध्याकाळी काही लोकांनी जाणीवपूर्वक असा हल्ला केल्याचं समोर येतंय. कारण जवळपास एक ट्रॉलीभरून दगड सापडले आहेत. काही लोकांनी घरांवर जमा करून ठेवलेले दगड पाहायला मिळाले. शस्त्रंही मोठ्या प्रमाणावर जप्त करण्यात आली आहे. वाहनांची जाळपोळ झाली आहे. ठरवून काही ठराविक घरांना, आस्थापनांना लक्ष्य करण्यात आलं आहे. त्यामुळे यात काही लोकांचा सुनियोजित पॅटर्न दिसतोय", असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

### डीसीपींवर कुऱ्हाडीनं वार

नागपूर दंगलीमध्ये तीन डीसीपी जखमी झाले असून त्यातील एकावर चक्क कुऱ्हाडीनं वार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यावर फडणवीसांनी विधानसभेत निवेदन देताना इशारा दिला आहे. पोलिसांवर हल्ला करणारे जे कुणी असतील, त्यांना सोडणार नाही, असं देवेंद्र फडणवीस विधानसभेत म्हणाले आहेत.

> "या घटनेत एक क्रेन, दोन जेसीबी व काही चारचाकी वाहने जाळण्यात आली. या संपूर्ण घटनेत ३३ पोलीस जखमी झाले आहेत. त्यात तीन उपायुक्त दर्जाचे पोलीस आहेत. त्यातल्या एका उपायुक्तावर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आला आहे. एकूण ५ नागरिक जखमी झाले आहेत. तिघांवर उपचार करुन घरी सोडण्यात आले आहे. दोन रुग्णालयात आहेत. त्यापैकी एक आयसीयूत आहे"
>
> - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




# शिलाई यंत्रे, घरघंटी वाटपात दलाली !

### आमदार किसन कथोरेंची विधानसभेत लक्षवेधीतून चौकशीची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर:** कुळगाव बदलापूर नगरपालिका, महिला व बालकल्याण विभाग आणि प्रधानमंत्री खजीन क्षेत्र योजनेअंतर्गत महिलांना शिलाई यंत्रे आणि घरघंटीचे वाटप करण्यात आले होते. मात्र या कामात आर्थिक देवाण घेवाण करत दलालांच्या मार्फत काही महिलांचे अर्ज बाद केल्याचा खळबळजनक आरोप मंगळवारी आमदार किसन कथोरे यांनी विधानसभेत केला. याप्रकरणी चौकशी करून कारवाई करणार का असा प्रश्न त्यांनी लक्ष्यवेधीच्या माध्यमातून उपस्थित केला. एकाच घराच दोन दोन मशिन वाटले गेले असाही आरोप कथोरे यांनी यावेळी केला. यंदाच्या अधिवेशनात दुसऱ्यांदा मांडलेल्या या विषयावरून शहरात राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

वर्ष २०२४ मध्ये कुळगाव बदलापूर नगरपालिका क्षेत्रातील महिलांना घरघंटी आणि शिलाई यंत्राचे वाटप करण्यात आले होते. या प्रस्तावाला २८ फेब्रुवारी २०२४ रोजी मान्यता देण्यात आली. मात्र महिला लाभार्थी निवड करताना आर्थिक देवाण घेवाण झाल्याचा आरोप मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी मंगळवारी विधानसभेत केला. लक्ष्यवेधी मांडत त्यांनी या प्रक्रियेतील अनेक बाबींवर आक्षेप नोंदवला. या प्रक्रियेत दलालांच्या मार्फत काही महिलांचे अर्ज बाद केले, असे कथोरे यावेळी म्हणाले. ठराविक पक्षाच्या माध्यमातून पात्र महिला निवडण्याचे काम केले गेले असेही कथोरे म्हणाले. याबाबत प्रशासकांना लेखी पत्र दिले होते. त्यात चौकशीपर्यंत शिलाई यंत्रे आणि घरघंटी वाटप थांबवण्याची मागणी केली होती.

मात्र त्यानंतरही कुणाच्या तरी दबावाखाली हे वाटप करण्यात आले, असेही कथोरे यावेळी म्हणाले. त्यामुळे शिलाई यंत्रे आणि घरघंटी वाटप करणाऱ्या महिला बाल कल्याण अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यात काही दलालांचा सहभाग होता. त्यांच्या माध्यमातून पात्र महिलांची निवड करण्यात आली असाही दावा कथोरे यांनी केला. काही महिलांचे अर्ज अपूर्ण दाखवण्यात आले. काही अर्ज गहाळ करण्यात आले. काही घरांमध्ये दोन दोन यंत्रे देण्यात आली. हा इतर महिलांवर अन्याय आहे, त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. शिलाई यंत्रे आणि घरघंटी खरेदीचे काम कुणाला दिले आहे, त्यात चढ्या दराने यंत्रांची खरेदी केली आहे असे सांगत या अधिकाऱ्यांची चौकशी करणार का, असाही प्रश्न किसन कथोरे यांनी उपस्थित केला.

यावर बोलताना उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आपल्या उत्तरात यंत्रे खरेदीचा प्रश्न नाही, असे स्पष्ट केले. यात लाभार्थ्यांच्या खात्यात थेट रक्कम दिली जाते. त्यामुळे यासाठी संस्था नेमण्याचा प्रश्नच नाही, असे सामंत म्हणाले. यासाठी अडीच कोटींच्या अधिन राहून वाटप करायचे होते. अर्ज अधिक असल्याने याबाबत सोडत काढण्यात आली. मात्र आमदारांच्या मागणीनुसार यात काही असल्यास चौकशी करू, असे सामंत म्हणाले.

> **वर्ष २०२४ मध्ये कुळगाव बदलापूर नगरपालिका क्षेत्रातील महिलांना घरघंटी आणि शिलाई यंत्राचे वाटप करण्यात आले होते. या प्रस्तावाला २८ फेब्रुवारी २०२४ रोजी मान्यता देण्यात आली. मात्र महिला लाभार्थी निवड करताना आर्थिक देवाण घेवाण झाल्याचा आरोप मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी मंगळवारी विधानसभेत केला. लक्ष्यवेधी मांडत त्यांनी या प्रक्रियेतील अनेक बाबींवर आक्षेप नोंदवला. या प्रक्रियेत दलालांच्या मार्फत काही महिलांचे अर्ज बाद केले, असे कथोरे यावेळी म्हणाले. ठराविक पक्षाच्या माध्यमातून पात्र महिला निवडण्याचे काम केले गेले असेही कथोरे म्हणाले.**

### नाशिक न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप नाही ....

# माणिकराव कोकाटेंना उच्च न्यायालयाचा दिलासा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना नाशिक येथील दंडाधिकारी न्यायालयाने खोट्या कागदपत्रांच्या आधारे चार घरे लाटण्याच्या प्रकरणात २० फेब्रुवारी रोजी दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजारांचा दंड अशी शिक्षा सुनावली होती. या निर्णयाला नाशिक सत्र न्यायालयाने स्थगिती दिली होती. सत्र न्यायालयाच्या निर्णयात उच्च न्यायालयाने मंगळवारी हस्तक्षेप करण्यास नकार दिला. तसेच, कोकाटे यांच्यासह अन्य प्रतिवाद्यांना नोटीस बजावून प्रकरणाची सुनावणी २१ एप्रिल रोजी ठेवली. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे कोकाटे यांच्यावरील अपात्रतेची कारवाई तूर्त टळली आहे.



दंडाधिकारी न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देताना नाशिक सत्र न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांना शिक्षा दिली तर त्यांच्या विधानसभा मतदारसंघाची निवडणूक पुन्हा घेण्याची वेळ येईल आणि जनतेचा पैसा खर्च होईल, असे निरीक्षण नोंदवले होते. न्यायालयाने नोंदवलेल्या या निरीक्षणावर आक्षेप घेऊन माजी मंत्री दिवंगत तुकाराम दिघोळे यांची कन्या आणि प्रकरणातील मूळ तक्रारदार अंजली राठोड यांनी नाशिक सत्र न्यायालयाने ५ मार्च रोजी दिलेल्या शिक्षेला स्थगिती देण्याच्या आदेशाविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायमूर्ती आर. एन. लड्डा यांच्या एकल खंडपीठासमोर ही याचिका मंगळवारी सुनावणीसाठी आली. त्यावेळी, अंजली राठोड या प्रकरणात तक्रारदार नसल्याने ही याचिका करण्याचा त्यांना अधिकर नाही. तसेच, त्यांची याचिका ऐकण्यायोग्य नाही, असे कोकाटे यांच्यावतीने न्यायालयाला सांगण्यात आले.

दरम्यान, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सत्र न्यायालयाच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी केली. न्यायालयाने मात्र या टप्प्यावर सत्र न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करणार नसल्याचे स्पष्ट केले आणि राज्य सरकारसह कोकाटे बंधूंना नोटीस बजावून प्रकरण २१ एप्रिल रोजी ठेवले.

# ठाणे जिल्हा परिषदेचा लोकाभिमुख अर्थसंकल्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दि. १८ :** ठाणे जिल्हा परिषदेचा २०२५-२६ या वर्षाचा अर्थसंकल्प आज मंगळवार, दि. १८ मार्च, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, बी. जे. हायस्कूल येथील सभागृहात सादर करण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्याकडे अर्थसंकल्प सादर करण्यासाठी अर्थसंकल्पाची प्रत यावेळी प्रदान केली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक रोहन घुगे यांनी जिल्हा परिषदेचा १०८.९३ कोटीं रुपयाचा अर्थसंकल्प सादर करताना लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक अर्थसंकल्प आहे असे प्रतिपादन केले.

जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प लोकाभिमुख असल्याचे सांगताना मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले की, समाज कल्याण विभाग अंतर्गत दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण करून जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींची माहिती, कुटुंब प्रमुख, आर्थिक स्थिती तसेच आवश्यकता लक्षात घेऊन २६ योजना तयार करण्यात आला आहेत. तसेच ग्रामपंचायत विभाग अंतर्गत घरपोच सोईसुविधा पोहोचवण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्र तसेच ऑनलाईन शासकीय दाखले देण्यासाठी अपमार्फत कामकाज करण्यात येणार आहे. कृषी विभाग व पशूसंवर्धन विभाग अंतर्गत शेतकरी व पशुपालकांचे उत्पन्न वाढीसाठी प्रत्यक्षरीत्या काम करण्यात येणार आहे. शासकीय कामकाजातील अडथळा कमी करण्यासाठी तसेच नियोजनबद्ध काम करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागांतर्गत वेब पोर्टल तयार करण्यात येणार असून प्रत्येक कर्मचारी-अधिकाऱ्यांची ऑनलाईन माहिती पोर्टलवर उपलब्ध असेल. जेणेकरून मेडिकल बिल, पेन्शन, सेवार्थ लाभ देण्यासाठी सुलभ असेल.




रोगनिदान चाचण्या ई संजीवनी कार्यक्रम दिव्यांगाना सार्वजनिक इमारती सुगम्य करणे इत्यादी लोकाभिमुख कार्यक्रम राबविताना वैद्यकीय प्रतिकृती देयक, भविष्य निर्वाह निधी, मालमत्ता नोंदणी, कामवाटप इत्यादींची संगणकीय प्रणाली निर्माण करून पारदर्शक व गतिमान कार्य करण्याचे यावेळी आश्वासित केले आहे. जिल्हा परिषदेचे स्व उत्पन्न वाढ करण्यासाठी मालमत्ता रजिस्ट्रेशन पोर्टल तयार करण्यात येणार आहे. सीएसआर फंड कोट्यवधी रुपये असून त्याचे नियोजन योग्यरीत्या करण्यासाठी सी. एस. आर. फंड साठी वेब पोर्टल तयार करून मदत करणाऱ्या सामाजिक संस्था यांना फंडची आवश्यकता लक्षात आणून देण्याचे काम या पोर्टल मार्फत करण्यात येईल तसेच आवश्यक त्या ठिकाणी सी. एस. आर फंड वापरण्याचे नियोजन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येईल.

ग्रामीण भागामध्ये शिक्षण, आरोग्य व महिला बालकल्याण या तीन विभागातील योजना योग्य पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. उत्पन्न वाढीसाठी जिल्हा परिषदेद्वारे योग्य गुंतवणूक व्यवस्थापन करण्यात आल्याने उत्पन्नामध्ये दहा कोटींची भरीव वाढ करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी राबविण्यात आलेल्या दिशा कार्यक्रमाची दखल राज्य शासनाद्वारे घेण्यात आली असून दिशा कार्यक्रम राज्यस्तरावर राबवला जाणार आहे.



# गीतासार



### अध्याय ५
### कर्मसंन्यासयोगः

नैव किञ्चित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् । पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छ स्वपञ्श्वसन् ॥ ५-८ ॥ प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि । इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ॥ ५-९ ॥

सांख्यायोगी तत्त्ववेत्याने पाहात असता, ऐकत असता, स्पर्श करीत असता, वास घेत असता, भोजन करीत असता, चालत असता, झोपत असता, श्वासोच्छ्वास करीत असता, बोलत असता, टाकीत असता, घेत असता, तसेच डोळ्यांनी उघडझाप करीत असतानाही सर्व इंद्रिये आपापल्या विषयांत वावरत आहेत, असे समजून निःसंशय असे मानावे की, मी काहीच करीत नाही. ॥ ५-८, ५-९ ॥

ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति यः । लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ॥ ५-१० ॥

जो पुरुष सर्व कर्मे परमात्म्याला अर्पण करून आणि आसक्ती सोडून कर्मे करतो, तो पुरुष पाण्यातील कमलपत्राप्रमाणे पापाने लिप्त होत नाही. ॥ ५-१० ॥

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिन्द्रियैरपि । योगिनः कर्म कुर्वन्ति सङ्गं त्यक्त्वात्मशुद्धये ॥ ५-११ ॥

कर्मयोगी ममत्वबुद्धी सोडून केवळ अंतःकरणाच्या शुद्धीसाठी इंद्रिये, मन, बुद्धी आणि शरीर यांच्याद्वारे आसक्ती सोडून कर्म करतात. ॥ ५-११ ॥

## आरोग्य
# तिळाचे फायदे



**पांढऱ्या तीळांमध्ये असलेले पोषक घटक**

पांढऱ्या तिळांमध्ये अनेक पोषक घटक आढळतात, जसे की:

- कॅल्शियम
- आयरन
- मॅग्नेशियम
- झिंक
- फायबर
- व्हिटॅमिन ई
- अँटीऑक्सिडंट्स

1. हाडे मजबूत करते: पांढऱ्या तीळांमध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात असते, जे हाडे मजबूत करण्यास मदत करते. हे ऑस्टियोपोरोसिस सारख्या आजारांना देखील प्रतिबंधित करते.

2. दात निरोगी ठेवते: पांढऱ्या तिळांमध्ये कॅल्शियम आणि फॉस्फरस असते, जे दात मजबूत आणि निरोगी ठेवण्यास मदत करते.

3. पचनसंस्था सुधारते: पांढऱ्या तिळामध्ये फायबर असते, जे पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. यामुळे बद्धकोष्ठतासारख्या समस्यांपासूनही आराम मिळतो.

4. त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर: पांढऱ्या तिळांमध्ये व्हिटॅमिन ई आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे त्वचा आणि केस निरोगी ठेवण्यास मदत करतात.

5. हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर: पांढऱ्या तिळांमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि ओमेगा-6 फॅटी ॲसिड हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात.

## सोहम फाऊंडेशनतर्फे
# आदिवासी मुलाला आर्थिक मदत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : भोसपाडा (खर्डी) येथील ओमकार सुभाष धापटे या आठ वर्षांच्या आदिवासी मुलाला रक्ताच्या कर्करोगाची (ब्लड कॅन्सर) लागण झाल्यामुळे त्याला मदत म्हणून हातभार लागावा यासाठी सोहम फाऊंडेशन वतीने तीस हजार आर्थिक मदत करण्यात आली.

शहापूर तालुक्यातील खर्डी (भोसपाडा) येथील ओमकार धापटे या आठ वर्षांच्या आदिवासी मुलाला रक्ताच्या कर्करोगाची (ब्लड कॅन्सर) लागण झाल्यामुळे वडिलांची परिस्थिती गरीब असल्याकारणाने त्याला वैद्यकीय खर्चासाठी मदतीचा हात म्हणून सोहम फाउंडेशन' च्या माध्यमातून रुपये तीस हजारांची रोख रक्कम मदत देऊन पुढील उपचारासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे म्हटले आहे.

यावेळी सोहम फाउंडेशनच्या अध्यक्षा वैदेही विवेक नार्वेकर, उपाध्यक्ष विवेक नार्वेकर, कुणाल नार्वेकर, उज्वला पाटील, महेशशेठ काबाडी, प्रियेश जगे, मयुरेश भोपतराव, मनोज पानसरे, नितीन निमसे, संदीप गोरले आदिजण उपस्थित होते.

## पडघ्यात
# संत तुकाराम बिज साजरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा येथे जगद्गुरू तुकाराम महाराज बिज व मंदीर वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज बिज व पंचपरमेश्वर मंदीर वर्धापन सोहळा १६ ते १८ मार्च रोजी कुणबी समाजोन्नती मंडळ यांच्या वतीने ओम साई नगर येथील संत तुकाराम महाराज मंदीरात घेण्यात आला. यावेळी वैकुंठ गमन किर्तन, भजन, प्रवचन सामुदायिक हरिपाठ, पालखी सोहळा, रात्री नामवंत महाराजांचे किर्तन नंतर जागर भजन असे तीन दिवस भरगच्च आध्यात्मिक कार्यक्रम घेण्यात आले या सोहळ्याची सांगता मंगळवारी हभप राजश्री म्हसकर दळखन यांच्या काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसादाने करण्यात आली. यावेळी परीसरातील नागरीकांनी, महीला, वृद्धांनी मंदीरात दर्शन व महाप्रसादासाठी गर्दी केली होती. यावेळी उपस्थित विविध मान्यवरांचा मंडळाच्या वतीने शाल श्रीफळ देऊन



सत्कार करण्यात आला.तर या बिज व वर्धापन दिन सोहळयासाठी नारायण राऊत, सदाशिव भोईर, सुदाम राऊत, वंसत पाटील, अरूण पाटील, तुकाराम शेलार, भगवान पाटोळे, संजय बिडवी, ज्ञानदेव मुंडे, गोपीनाथ कथोरे रवी राऊत, शंकर बाणे भिमराव राऊत, मदन मिरकुटे आंनद पाटील यांनी मेहनत घेतली. तर यावेळी सरपंच रविंद्र विशे, निशा पाटील कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती डॉ. संजय पाटील, डॉ के. बी. विशे, माजी सरपंच पराग पाटोळे, महादेव गोरले, अशोक गायकवाड उपस्थित होते.

# आला उन्हाळा आरोग्य सांभाळा



राज्यात सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यातील तापमान वाढायला सुरुवात झाली होती. सर्वत्र उकाडा जाणवत होता. आता मार्च महिन्याच्या अखेरीस तर राज्यातील अनेक शहरांचे तापमान उच्चांकी पातळीवर पोहचले आहे. राज्यातील अनेक शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात पोहचले आहे. काही शहरांनी तर ४० अंशाचा आकडा देखील पार केला आहे. विदर्भ मराठवाड्यात तर तापमानाने आजच उच्चांक गाठला आहे. पुढील दोन आठवड्यात राज्यातील सर्वच शहरांचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या घरात पोहचेल आणि राज्यात प्रचंड उकाडा जाणवेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढील दोन महिने राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल आणि राज्यात यावर्षी प्रचंड उकाडा जाणवेल हा हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरताना दिसत आहे. याशिवाय यावर्षी राज्यात उष्णतेच्या लाटा येतील असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हा अंदाज नागरिकांची झोप उडवणारा ठरत आहे कारण मार्च महिन्यातच सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली असल्याने पुढील दोन महिने कसे निघेल याच चिंतेत नागरिक आहेत. पुढील दोन महिन्यात राज्यात उष्णतेच्या लाटा येणार असून तापमान प्रचंड वाढणार असल्याने हे दोन महिने जनतेसाठी जीकरीचे ठरणार असल्याने उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागणार आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाळ्याच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिणाम माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. रक्तदाब आणि मधुमेहासारख्या व्याधी असलेल्या व्यक्तींनी उन्हाळ्यात विशेष खबरदारी घ्यावी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळीच उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता असते. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे. दुपारी बारा ते चार घराबाहेर पडूच नये, काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ, सच्छिद्र कपडे वापरावेत. उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाणी कमी होते त्यामुळे डीहायड्रेशन होते. डीहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते आणि चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी सतत पाणी पीत राहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराबाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत न्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्यांचे, फळांचे रस दररोज प्यायले तरी हरकत नाही. मार्च महिन्यातच उन्हाळ्याच्या झळा जाणवू लागल्याने पुढील दोन महिने उष्णतेची तीव्रता किती असेल याची कल्पना केली तरी या वर्षीची उन्हाची दाहकता लक्षात येईल. त्यामुळेच प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून स्वतःचा बचाव करू शकतो.

- श्याम ठाणेदार ,दौंड जिल्हा पुणे

## कल्याणमध्ये
# हिंदू नववर्ष स्वागतयात्रेचे आयोजन

**इनरव्हील क्लब ऑफ कल्याण व कल्याण संस्कृती मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील चैत्र शुद्ध प्रतिपदा, गुढी पाडवा म्हणजेच ३० मार्च रोजी इनरव्हील क्लब ऑफ कल्याण व कल्याण संस्कृती मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सहकार्याने दिमाखदार हिंदू नववर्ष स्वागतयात्रा २०२५ आयोजित केली आहे.

या अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन वर्षभर करण्यात आले होते. त्यामधे मुख्यतः दिंडी, मंगळागौर स्पर्धा, भागवत सप्ताह आणि होलिका दहन हे कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. सर्व कार्यक्रमास कल्याणकरांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती



दर्शवली. रविवार दिनांक २३ मार्च संध्याकाळी ५.३० वाजता 'स्वरांगिणी' हा सूर-तालाचा अनोखा मिलाफ असलेला गाण्याचा कार्यक्रम प्रबोधनकार ठाकरे सरोवर (काळा तलाव) येथे होणार आहे. त्यानंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी संध्याकाळी ७ वाजता दीपोत्सव साजरा केला जाणार आहे. या मधे नागरिकांना सरोवरच्या परिसरात दिवे / पणत्या लावून दीपोत्सव साजरा करायचा आहे.

शुक्रवार दिनांक २८ मार्चला यशवंतराव चव्हाण मैदान, रामबाग (मॅक्सी ग्राउंड) येथे संस्कार भारती कल्याण शाखा यांच्यावतीने भव्य रांगोळी काढली जाणार आहे. ही रांगोळी सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत प्रदर्शनासाठी खुली असेल. रविवार दिनांक ३० मार्च सकाळी ६ वाजता कमिशनर बंगला, सिंडीकेट येथून हिंदू नववर्ष स्वागतयात्रेस आरंभ होईल.

इनरव्हील क्लब ऑफ कल्याणच्या अध्यक्षा डॉ. अर्चना सोमाणी, सचिव ॲड. नीता कदम, प्रकल्प प्रमुख ॲड. अर्चना सबनीस, सहप्रमुख मीनाक्षी देवकर यांनी इनरव्हील क्लब ऑफ कल्याण तर्फे तसेच कल्याण संस्कृती मंचचे अध्यक्ष डॉ. सुश्रुत वैद्य, सचिव अमोल जोशी, कोषाध्यक्ष दीपक चौधरी, सदस्य ॲड. निखिल बुधकर यांनी कल्याण संस्कृती मंच आणि केडीएमसी उपायुक्त संजय जाधव यांच्यातर्फे या सर्व कार्यक्रमांसाठी सर्व नागरिकांना आग्रहाचे आमंत्रण दिले आहे. नागरिकांनी पारंपरिक वेषात व उत्साहात सहभागी व्हावे तसेच ज्यांना यात्रेमधे चित्ररथ रुपाने सहभागी व्हायचे असेल त्यांनी आयोजकांशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## शेलारपाड्यात
# शिवजयंती उत्साहात साजरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलचा आदर, प्रेम आणि अभिमान व्यक्त करण्यासाठी शिवप्रेमींनी विविध कार्यक्रमांतून शिवजयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी केली.

या वेळी शिवगर्जना मित्र मंडळातर्फे मिरवणुका काढून, सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करून, शिवाजी महाराजांना मानवंदना दिली. छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास घरा घरापर्यंत पोचविण्यासाठी शिवगर्जना मित्र मंडळाने नुकताच छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर प्रदर्शित झालेला छावा चित्रपट शेलारपाडा गावात प्रोजेक्टर वर दाखवण्यात आला. या वेळी लहान मुलांनी, महिलांनी व ग्रामस्थानी उत्सपूर्द प्रतिसाद दिला.



# संघाच्या शाखेवर दगडफेक मुख्य सूत्रधारांचा त्वरित शोध घ्या
## - नरेंद्र पवार यांची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेच्या कचोरे गावातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बालसंस्कार केंद्रावर काही दिवसांपूर्वी समाजकंटकांकडून दगडफेक केल्याची घटना घडली होती. याचे कल्याण डोंबिवलीमध्ये तीव्र पडसाद उमटत असून या घटनेमागील मुख्य सूत्रधाराचा तातडीने शोध घेऊन कायदेशीर कारवाई करण्याची मागणी भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी केली आहे. यासंदर्भात पवार यांनी आज कल्याणचे एसीपी कल्याणजी घेटे यांची भेट घेत निवेदन दिले.

कल्याण पूर्वेच्या कचोरे गावातील चौधरी वाड्यातील मोकळ्या जागेमध्ये दररोज सायंकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा बालसंस्कार वर्ग भरवण्यात येतो. यामध्ये स्थानिक परिसरातील 8 ते 15 वयोगटातील मुलांना मर्दानी खेळ, राष्ट्रभक्ती आणि बाल संस्काराचे धडे शिकवले जातात. मात्र गेल्या आठवड्यात 9 मार्च रोजी रात्री 8 वाजण्याच्या सुमारास या बालसंस्कार केंद्रावर न्यू गोविंदवाडी बीएसयूपी इमारतीच्या दिशेने सिमेंट कॉंक्रीटचे तुकडे असणारे दगड भिरकावण्यात आल्याचे सांगत हा अत्यंत निषेधार्ह प्रकार असल्याचे नरेंद्र पवार यांनी यावेळी स्पष्ट केले. दरम्यान या दगडफेकीच्या प्रकारावरून त्यामागे नक्कीच कोणीतरी मास्टर माईंड असल्याचा संशय माजी आमदार नरेंद्र पवार यांनी व्यक्त केला आहे. तसेच यामागचे खरे सूत्रधार कोण आहेत याचा लवकरात लवकर छडा लावून तातडीने कारवाई करण्याची आग्रही मागणीही नरेंद्र पवार यांनी पोलिसांकडे केली आहे. यावेळी कल्याण विकास फाऊंडेशन अध्यक्षा हेमलता पवार, माजी आमदार नरेंद्र पवार, संजीवनी पाटील, डॉ. सुनिल हरपाळे, समृद्धी देशपांडे, सुनिल शेट्टी, अनिल लांडगे, अतुल प्रजापती, मकरंद ताम्हणे,विकास पाटील, काका गवळी, सचिन गायकर, संजय शेलार, विवेक गायकर, भरत पाटील, रोहित लांबतुरे, मयूर जाधव, मॉंटी कारभारी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी ११ महिन्यांचा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार क्षमता वाढविण्याकरीता सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत कार्य प्रशिक्षणाचा कालावधी 11 महिने करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायकआयुक्त,श्रीम.अ.मु.पवार यांनी दिलीआहे.

त्यानुषंगाने कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून आस्थापना तसेच उमेदवारांकरीता खालील सूचना देण्यात येत आहेत.मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत सद्य:स्थितीत जे उमेदवार कार्य प्रशिक्षण घेत आहेत, त्यांचा कार्य प्रशिक्षण कालावधी ते रुजू झाल्याच्या दिनांकापासून 11 महिने असेल. तसेच ज्या उमेदवारांच्या 6 महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी या पूर्वीच पूर्ण झाला आहे अशा उमेदवारांनी पुढील 5 महिन्यांच्या प्रशिक्षणांसाठी संबंधित आस्थापनेत रुजू व्हावे. ज्या उमेदवारांचा 6 महिन्याचा प्रशिक्षण कालावधी यापुर्वी पूर्ण झाला आहे त्या उमेदवारांना ते रुजू झाल्याच्या दिनांकापासून पुढील 5 महिन्याच्या कालावधीसाठी कार्य प्रशिक्षणास उमेदवार करून घेता येईल . ज्या उमेदवारांचा 6 महिन्याचा प्रशिक्षण कालावधी यापुर्वी पुर्ण झाला आहे अशा उमेदवारांनी पुढील 5 महिन्याच्या कालावधीसाठी 30 एप्रिल,2025 पूर्वी संबंधित आस्थापनेत रुजू व्हावे. या योजनेत यापूर्वी सहभागी असलेल्या खाजगी आस्थापनांनी Certificate Of Incorporation/उद्यमआधार व EPF/ESIC/GST/DPIT यापैकी एक अशाप्रकारे किमान दोन प्रमाणपत्र विभागच्या http://www.cmykpy.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर 30 दिवसाच्या आत सादर करावे. या योजनेअंतर्गत कार्यप्रशिक्षणसाठी यापूर्वी रुजू झालेल्या व नव्याने रुजू होणाऱ्या उमेदवाराने तो संबंधित आस्थापनेत तसेच सदर आस्थापनेशी संबंधित इतर आस्थापना / कार्यालयात यापूर्वी कधी ही कायम/तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत नसल्याबाबतचे तसेच कुठलेही हितसंबध नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रुजू होते वेळी संबंधित आस्थापनेस सादर करणे अनिवार्य राहील. याबाबतची खातर जमा करुनच संबंधित आस्थापना यांनी उमेदवार रुजू करुन घ्यावेत.

दि.11 मार्च2025 रोजीच्या शासन निर्णयातील नमूद सुचनेस अनुसरून सदर प्रशिक्षण कालावधीमध्ये यापुढे वाढ करण्यात येणार नाही, या योजनेअंतर्गत आस्थापना/उद्योग/महामंडळामार्फत विना अनुभवी रोजगार इच्छुक पात्र उमेदवारानां संबंधित आस्थपनेत कायमस्वरूपी नोकरीचा हक्क राहणार नाही. याबत काही समस्या असल्यास या कार्यालयाचे दुरध्वनी क्रमांक 02141-222029 व मोबाईलक्रमांक 9850411187 वर संपर्क साधावा.

# मोहन्यातील लहुजी नगरमध्ये सांडपाण्याचा प्रश्न बिकट
## महापालिका व रेल्वे अधिकाऱ्यांवर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : मोहने परिसरातील लहुजीनगर येथे सध्या सांडपाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. रेल्वेच्या कल्याण कसारा लोहमार्ग चौपदरीकरणाच्या कामात सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटारी बुजवण्यात आल्यामुळे सांडपाणी थेट नागरिकांच्या घरात शिरत आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या समस्येची त्वरित सोडवणूक न झाल्यास संतप्त नागरिकांनी महापालिका अधिकारी आणि रेल्वे अधिकाऱ्यांविरोधात ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

कल्याण कसारा रेल्वे मार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामादरम्यान सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटारी बंद केल्या गेल्याने संपूर्ण मोहने लहुजी नगर परिसरात सांडपाण्याची समस्या गंभीर बनली आहे. पावसाळा जवळ येत असल्याने ही समस्या अधिकच तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे संपूर्ण लहुजी नगर परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचे गंभीर धोके निर्माण झाले आहेत. लहान मुले आणि वृद्ध नागरिकांना या समस्येचा सर्वाधिक त्रास होत आहे. अनेक घरांमध्ये सांडपाणी शिरल्यामुळे घरातील वस्तूंचे नुकसान झाले आहे.

नागरिकांनी वारंवार महापालिका आणि रेल्वे प्रशासनाकडे तक्रारी केल्या असूनही यावर कोणतेही ठोस पाऊल उचलले गेलेले नाही. नागरिकांच्या तक्रारीकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप लहुजी क्रांती सेना ठाणे जिल्हा युवक अध्यक्ष श्रावण बनसोडे यांनी केला आहे. "आम्ही वारंवार निवेदने दिली, अधिकाऱ्यांशी चर्चा केली; पण कोणीही लक्ष देत नाही. आता परिस्थिती हाताबाहेर गेली आहे, लहुजी नगर ही संपूर्ण वस्ती दलित वस्ती असल्याने या समस्या कडे रेल्वे अधिकारी आणि महापालिका अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. या प्रकारामुळे अनुसूचित जाती-जमातीच्या नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असल्याने महापालिका आणि रेल्वे अधिकाऱ्यांविरोधात ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. "नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून प्रशासनाचे हे वर्तन सामाजिक न्यायाच्या तत्वांना धरून नाही. त्यामुळे त्वरित कारवाई न केल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल," असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पक्षाच्या उपाध्यक्ष संध्या साठे यांनी दिला आहे.

या प्रकरणावर महापालिकेचे अधिकारी आणि रेल्वे प्रशासनाने तातडीने बैठक घेऊन लवकरात लवकर या समस्येचे निराकरण करण्याचे आश्वासन सहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी दिले आहे. गटारी साफ करून नव्या पद्धतीने जलवाहिन्या टाकण्यात येतील, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र, नागरिकांनी प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या आश्वासनांवर विश्वास ठेवून महिना उलटला तरी अद्याप या कामाला सुरुवात झाली नाही. रेल्वे प्रशासनाने आणि महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न सोडवला नाही.

रेल्वे प्रशासनाने आणि महापालिकेने हा प्रश्न पंधरा दिवसात मार्गी लावावा अन्यथा रेल्वे मार्ग बंद पाडण्यात येईल तसेच लहुजी नगर नागरिकांच्या वतीने मोठे आंदोलन करण्यात येईल असे श्रावण बनसोडे यांनी सांगितले.


जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित

जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | कोर्स | कालावधी |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# विरार अलिबाग कॉरिडॉर : २०१३ च्या भूसंपादन कायद्याची अंमलबजावणी करा – न्यायालयाचे निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण** : न्यायालयाने नवी मुंबई विमानतळासाठी २०१३ च्या भूसंपादन कायद्याची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे उरण मधील सिडकोच्या लॉजिस्टक पार्क, रिजनल पार्क तसेच विरार अलिबाग कॉरिडॉर या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठीही २०१३ च्या कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.





यूपीए सरकारच्या काळात देशातील १८९४ चा ब्रिटीशकालीन भूसंपादन कायदा रद्द करून त्या जागी २०१३ चा नवा भूसंपादन आणि पुनर्वसन कायदा लागू करण्यात आला आहे. हा कायदा २०१४ पासून अंमलात आला आहे. मात्र महाराष्ट्र राज्य सरकार आणि सिडकोकडून भूसंपादन करतांना हा कायदा अंमलात आणला जात नाही. त्याऐवजी शेतकऱ्यांकडून संमती पत्र घेऊन भूसंपादन केले जात आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमीन आणि भूखंडाला अधिकचा दर देण्यासाठी न्यायालयात दाद मागता येत नाही.

ही तरतूद ब्रिटिश कालीन आणि २०१३ च्या नव्या भूसंपादन कायद्यात आहे. शिवाय २०१३ च्या कायद्यात शेतकऱ्यांना बाजार दराच्या चार ते सहा टक्के अधिक दर तसेच संपादित जमिनीच्या २० टक्के विकसित भूखंड,बागायती जमीनीसाठी अधिकचा दर, शेतकऱ्यांप्रमाणे समुद्रावर अवलंबून असलेल्या मासेमारी करणाऱ्यांना पुनर्वसन कायद्यात समावेश करण्यात आला आहे.

अशा सर्व शेतकऱ्यांच्या लाभाच्या व फायद्याच्या तरतुदी असणारा कायद्याची सरकारकडून अंमलबजावणी केली जात नाही. त्यामुळे शेतकरी नाडला जात आहे. याच संदर्भात नवी मुंबई विमानतळबाधित शेतकरी उच्च न्यायालयात गेले असतांना २०१३ चा कायदा लागू करण्याचे आदेश दिले आहेत. याच पार्श्वभूमीवर विरार अलिबाग कॉरिडॉरबाधित शेतकऱ्यांनी हा कायदा लागू करण्याची मागणी सरकारकडे केली असल्याची माहिती शेतकरी समितीचे सचिव रवींद्र कासुकर यांनी दिली आहे.

# खोपोलीत कर भरण्यासाठी नागरिकांची रीघ

> **कोणतीही अप्रिय कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी तातडीने पाणीपट्टी व मालमत्ता कर भरावा. वर्षानुवर्षे थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांकडून विकसक व औद्योगिक क्षेत्रातील थकबाकीदारांकडून करवसुलीसाठी नगरपालिकेकडून मोहीम तीव्र करण्यात आली आहे. कर भरा, अन्यथा कारवाईला सामोरे जा, असा निर्वाणीचा इशारा नोटिशीद्वारे थकबाकीदारांना देण्यात आला आहे.**
>
> **– डॉ. पंकज पाटील, मुख्याधिकारी, खोपोली**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खोपोली, ता. १८ (बातमीदार)**

मार्च अखेरपर्यंत जास्तीत जास्त करवसुलीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी खोपोली नगरपालिकेकडून मालमत्ता व पाणीपट्टी करवसुलीसाठी जोरदार मोहीम राबवण्यात येत आहे. नागरिकांकडूनही मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळत असून, कर भरणा करण्यासाठी पालिकेत रांगा लागत आहेत. पालिकेकडून थकबाकीदारांना नोटिसा बजावणे, नळजोडणी खंडित करणे आदी कारवाईही सुरू करण्यात आली आहे. कर भरणा अधिक सुलभ व्हावा, यासाठी शहरातील विविध रहिवासी भागात विशेष वसुली पथक नियुक्त करून कॅम्प लावून वसुली मोहीम तीव्र केली जात आहे. पालिका कार्यालयातही पाणीपट्टी व मालमत्ता कर भरणा सुरळीत व्हावा म्हणून अतिरिक्त खिडक्या सुरू केल्या आहेत. यात रोख रक्कम, धनादेश व डेबिट कार्ड व ऑनलाइन पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. आठ दिवसांत दररोज सरासरी १० लाखांच्या वर करवसुली होत असल्याचे वसुली अधिकाऱ्यांनी सांगितले.

# बाल्कनी मोजून घरांचा आकार योग्यच !

## कमी क्षेत्रफळाच्या घरांवर सिडकोची सारवासारव | स्थानिक लोकप्रतिनिधींचा संताप कायम



सिडकोच्या कारभारावर संताप

विजेत्यांना कमी क्षेत्रफळाची घरे !

आमदार संदीप नाईक यांचा सिडकोला खबरदारीचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : नवी मुंबईत सिडकोच्या घरांच्या किमंतीवरून सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचा सूर असतानाच आता सिडकोच्या घराचे क्षेत्रफळ कमी असल्याच्या तक्रारी आता पुढे येऊ लागल्या आहेत. जाहिरातीमध्ये ३२२ चौ. फूट क्षेत्रफळ इतकी सदनिका दर्शविली होती. परंतु आता विजेत्यांना २९१. ९२ चौ. फूट इतकीच सदनिका विजेत्यांच्या इरादा पत्रात नमूद आहे. त्यामुळे सिडकोच्या कारभाराविषयी संताप व्यक्त होत आहे. या प्रकारानंतर वन मंत्री गणेश नाईक यांचे पुत्र तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) नेते माजी आमदार संदीप नाईक यांनी सिडकोला खबरदारीचा इशारा दिला आहे. तसेच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्र्यांनाही पत्रव्यवहार केला आहे. सिडको सोडतीतील विजेत्यांना जाहिर केल्याप्रमाणेच सदनिकाच द्याव्यात, अशी मागणी केली आहे.

नवी मुंबईत घर घेता यावे यासाठी अनेकांनी सिडकोच्या २०२४ मध्ये निघालेल्या 'माझे पसंतीचे घर' सोडतीमध्ये अर्ज केला होता. परंतु या सोडतीमध्ये अनेक घरांच्या किमंती या अवाक्याबाहेर होत्या. त्यामुळे नागरिकांमध्ये या सोडती विषयी नाराजी होती. घराच्या किमंती वाढलेल्या असतानाच, आता सिडकोने जाहिरातीत दिलेल्या चटई क्षेत्रफळापेक्षा कमी क्षेत्रफळाची घरे उपलब्ध करुन दिल्याचे समोर येत आहे. या बाबत आता सिडको सोडतीतील विजेत्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. सिडकोने सोडतीपूर्वी दर्शविलेल्या जाहिरातीमध्ये वाशी येथील एक 'बीएचके' घरांचे चटई क्षेत्रफळ ३२२ चौ.फूट दर्शविले होते. परंतु लेटर ऑफ इंटेन्ट अर्थात इरादा पत्रात घरांचे क्षेत्रफळ २९१.९२ चौ. फूट इतकेच दर्शविले आहे.

या प्रकाराविषयी विजेत्यांकडून संताप व्यक्त होत आहे. वन मंत्री गणेश नाईक यांचे पुत्र तथा शरद पवार गटाचे नेते माजी आमदार संदीप नाईक यांनी याविषयी सिडकोला इशारा दिला आहे.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : 'माझे पसंतीचे घर' या योजनेच्या माध्यमातून २६ हजार घरे विक्रीसाठी काढणाऱ्या सिडको प्रशासनाने आता बाल्कनीचे क्षेत्र मोजल्यास घरांचे क्षेत्र योग्यच असल्याची सारवासारव सुरू केली आहे. ही सोडत काढत असताना केलेल्या जाहिरातीत घरांचा आकार ३२२ चौरस फुटांचा असेल असा दावा केला गेला होता.





प्रत्यक्षात मात्र घराच्या इरादा पत्रात २९१.९२ चौरस फुटांचा उल्लेख असल्यामुळे ग्राहकांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. माजी आमदार संदीप नाईक यांनीही या प्रकरणी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून ही तफावत कागदपत्रांसह दाखवून देण्याचा प्रयत्न केला. या पार्श्वभूमीवर रेरा कायद्यानूसार घर विक्री करताना मूळ घराचे चटईक्षेत्र (कारपेट) उल्लेख करावा लागतो. तसेच घरासोबतच्या बाल्कनीच्या क्षेत्राचा उल्लेख नसल्यामुळे ही तफावत वाटत असल्याचा खुलासा सिडको प्रशासनाने केला आहे.

सिडकोचे घर प्रधानमंत्री आवास योजनेमुळे स्वस्त दरात मिळेल या उद्देशाने सर्वसामान्य नागरिकांनी या योजनेत घरांसाठी अर्ज नोंदणी केली. २६ हजार घरांच्या सोडत प्रक्रियेमध्ये २१,४०० अर्जदारांचे अर्ज आले होते. त्यापैकी १९,५१८ अर्जदार विजेते ठरले होते. प्रत्यक्षात १३,५१८ विजेते होते. परंतू सहा हजार अर्जदारांना सोडतीच्या संगणकीय प्रणालीव्दारे पसंतीचे घर नसतानाही पसंतीच्या घराजवळचा पर्याय सुचविला होता. त्यापैकी तीन हजार अर्जदारांनी पसंतीचे घर नसल्याने या प्रक्रियेतून माघार घेत असल्याचे जाहीर केले.

दरम्यान विजेत्यांना सिडकोने इरादा पत्र पाठविताच या मुद्दयावरुन नवा वाद सुरु झाला आहे.

या इरादापत्रात दिलेल्या घरांचे क्षेत्रफळ आणि प्रत्यक्षात जाहिरातीमधील क्षेत्रफळात तफावत असल्याने ग्राहकांमधून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. जाहिरातीमध्ये ३२२ चौरस फुटाचा उल्लेख असलेल्या घराचे इरादापत्रात रेरा कायद्यानूसार २७.१२ चौरस मीटर क्षेत्रफळ दर्शविल्याने ३० चौरस फुटाच्या बाल्कनीच्या क्षेत्रफळाची किंमत मूळ चटई क्षेत्रफळाप्रमाणे सिडको आकारत असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे.

> सिडकोने जाहीर केलेल्या गृहनिर्माण योजनेत अत्यल्प आणि अल्प उत्पन्न या घटकांतर्गत घटकातील वन बीचके घरांचे क्षेत्रफळ ३२२ चौ. फुट असल्याचे नमूद कराण्यात आले आहे. सदरचे क्षेत्रफळ हे बरोबर असून प्रत्यक्षात जागेवर (२९ चौ.मी.) घरांचे क्षेत्रफळ हे ३२२ चौ. फूट असेच आहे. या क्षेत्रफळामध्ये त्या घरात बाल्कनीचे क्षेत्रफळ समाविष्ट आहे. प्रकल्पातील घरांची रेरामध्ये नोंदणी करताना रेरा चटई क्षेत्रफळामध्ये (२७.१२ चौ.मी) संबंधित दोन अंतर्गत बाल्कनीच्या क्षेत्रफळाचा समावेश करण्यात येत नाही. त्यामुळे विजेते अर्जदारांना सिडकोमार्फत वाटप करण्यात आलेल्या इरादापत्रात रेरा चटई क्षेत्रफळ (२७.१२ चौ.मी) नमूद करण्यात आले आहे,
>
> – प्रिया रातांबे
> मुख्य जनसंपर्क अधिकारी
> सिडको

## संदीप नाईक आक्रमक

**यापकरणी राजकीय वर्तुळातही तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. वनमंत्री गणेश नाईक यांचे माजी आमदार पुत्र संदीप यांनी या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठविले आहे. यात त्यांनी म्हटले आहे की, 'सिडकोची महागृहनिर्माण योजना 'माझे पसंतीचे घर' २०२४ मध्ये सोडतीत विजेत्यांना मूळ जाहीर केलेल्या क्षेत्रफळापेक्षा कमी क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात येत असल्याचे उघड झाले आहे. यावेळी जाहीर करण्यात आलेल्या माहितीप्रमाणे एलआयजी गटासाठी ३२२ चौरस फूट क्षेत्रफळ असलेल्या सदनिका देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, सोडतीच्या निकालानंतर विजेत्यांना मिळालेल्या इरादा पत्रात सदनिकेचा रेरा क्षेत्रफळ २९१. ९१ चौ. फूट (२७.१२ चौरस मीटर) इतका असल्याचे नमूद करण्यात आले आहे, ही जागा मूळ घोषणा केलेल्या क्षेत्रफळापेक्षा जवळपास ३० चौरस फूट कमी आहे. सिडको प्रशासनाने गृहनिर्माण योजनेच्या मूळ माहितीपत्रकात उल्लेख केलेल्या ३२२ चौ. फूट क्षेत्रफळ असलेल्या सदनिकाच लाभार्थ्यांना द्याव्यात. लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या क्षेत्रफळापासून वंचित ठेवले जाणार नाही, याची खबरदारी सिडकोने घ्यावी, असे या पत्रात म्हटले आहे.**

# शिधावाटप केंद्रावर धान्याचा काळाबाजार!

## वसईतील पाच दुकानांचे परवाने रद्द

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसईः** वसईतील धान्याचा काळाबाजार करणाऱ्या ५ शिधावाटप दुकानांचे परवाने रद्द करणअयात आले आहे. या रास्तभाव दुकानात येणारे धान्य खासगी बाजारात विकले जात होते. याप्रकरणी माणिकपूर पोलीस ठाण्यात रास्तभाव दुकानदारांवर गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे.





वसईतही शिधावाटप दुकानात धान्याचा काळाबाजार होत असल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला होता. भारतीय खाद्य निगम कडून येणारे धान्य शिधावाटप केंद्रात न उतरवता ते अन्य ठिकाणी उतरवले जात होते. याप्रकरणी रास्तभाव दुकान चालविणारे जगदंबा महिला बचत गट, जितेंद्र चव्हाण, श्रमिक महिला बचत गट, आदिशक्ती महिला बचत गट आदींविरोधात माणिकपूर पोलीस ठाण्यात अत्यावश्यक वस्तू अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या धान्याचा काळाबाजार प्रकरणाची जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांमार्फत स्वतंत्र चौकशी करण्यात आली होती. चौकशी मध्ये धान्याचा काळाबाजार होत असल्याचे आढळून आले. त्यामुळे रास्तभाव दुकान चालवणारा आनंद जैस्वाल (उमराळे) श्रमिक महिला बचत गट (माणिकपूर), महालक्ष्मी महिला बचत गट ( माणिकपूर) आदिशक्ती महिला बचत गट (माणिकपूर) सरस्वती महिला बचत गट यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. ही रास्तभाव दुकाने नजीकच्या रास्तभाव दुकानाशी तात्पुरत्या स्वरूपात जोडली जाणार आहेत, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी पोपट ओमासे यांनी काढलेल्या आदेशात दिली आहे. ज्या दुकानांमध्ये धान्याचा काळाबाजार झाला होता. त्यांची चौकशी त्यांचे शिधावाटप केंद्राचे परवाने रद्द करण्यात आले आहे अशी माहिती वसईच्ये पुरवठा निरीक्षक भागवत सोनार यांनी दिली. यातील सरस्वती महिला बचत गटाच्या अध्यक्षा अश्वनी गुरव या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आहेत.

### असा झाला घोटाळा

**अन्न पुरवठा विभागाच्या माध्यमातून शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्याचे वितरण केले जाते. या धान्याचे वितरण करण्यासाठी वसईत १८० शिधावाटप केंद्र आहेत. भारतीय खाद्य निगम (एफसीआय) बोरीवली येथून धान्य या शिधावाटप दुकानात पोहोचवले जाते आणि नंतर ते नागरिकांना देण्यात येते. मात्र हा ट्रक अन्य ठिकाणी उतरविण्यात येत असल्याच्या तक्रारी आल्या होत्या. ज्या ठिकाणी धान्य उतरविण्याचे चलन नसतानाही वसईतील धान्य दुकानात धान्याच्या गोणी उतरवल्या जात होत्या. काही दुकानात निश्चित धान्यापेक्षा कमी धान्य उतरविले जात होते. या प्रकाराबाबत वसईतील सामाजिक कार्यकर्त्यांनी तक्रार पुरवठा विभागाकडे केली होती आणि रंगेहाथ हा घोटाळा उघडकीस आणला होता.**

# बैल बाजाराकडे शेतकऱ्यांची पाठ


## मुरबाड बाजार समितीच्या उत्पन्नावर परिणाम

**मुरबाड** : ता. १८ (बातमीदार) मुरबाड तालुक्यातील सरळगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समिती उपबाजारातील मंगळवारचा आठवडा बैलबाजार ठाणे जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध आहे. या बैलबाजारात नाशिक, बेल्हा, इगतपुरी, कर्जत, शहापूर, जुन्नर, ओतूर, आळेफाटा येथील शेतकरी विविध प्रकारच्या जनावरे विक्रीसाठी येत असतात, परंतु काही दिवसापासून आठवडा बाजारातील जनावरांची आवक मंदावल्यामुळे खरेदी-विक्रीही मंदावली आहे. सरळगाव येथील आठवडा बाजारामध्ये बैल, म्हशी, रेडे, बकरी यासारख्या प्राण्यांच्या खरेदी-विक्री कमी प्रमाणात होते. राज्याच्या कानाकोपऱ्यातून विविध जनावरांची येथे विक्री होत होती, पण मंगळवारी ५० ते ६० म्हशी, रेडे विक्रीसाठी आले होते. शेतकऱ्यांनी बाजाराकडे पाठ फिरवल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्नावरही परिणाम झाला आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे बैलजोडीऐवजी ट्रॅक्टरलाच पसंती दिली जात आहे. तसेच चारा वाढल्याने बैलजोडी सांभाळणे कठीण झाले आहे. तसेच बैलाची देखभाल करण्यासाठी प्रतिदिवस ४०० ते ५०० रुपयांची मजुरी द्यावी लागते. त्यामुळे बैल सांभाळणे खर्चिक झाले आहे, तर बैलगाडा शर्यतींमुळे हौशी लोक खरेदी करत असल्याने बैलांच्या किमती अवाच्या सव्वा वाढल्या आहेत. त्यामुळे सरळगावातील जनावरांची खरेदी-विक्रीही मंदावल्याचे चित्र आहे.

> **सध्याच्या काळात अनेक जण ट्रॅक्टरच्या साह्याने शेती करतात. त्यामुळे सरळगाव बाजारामध्ये बैल जोडीची खरेदी-विक्री कमी होत चालली आहे. त्याचा परिणाम बाजार समितीच्या उत्पन्नावरही झाला आहे.**
>
> **– बाळकृष्ण चौधरी, सभापती, बाजार समिती, मुरबाड**

काही वर्षांपूर्वी सरळगाव आठवडा बाजारामधून मुरबाड कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक उत्पन्न १७ ते १८ लाख होत होते. आता मात्र वार्षिक उत्पन्न ४० ते ५० टक्क्यांनी कमी झाल्याचे बाजार समितीचे सचिव दशरथ भगत यांनी सांगितले. अशातच उन्हाच्या तडाख्याने खरेदी-विक्री कमी होत असल्याने मंदीचा फटका बाजार समितीला बसत आहे.

# जलजीवन अंतर्गत उभारलेल्या टाकीचा स्लॅब कोसळून दोन विद्यार्थिनींचा मृत्यू





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर** : जल जीवन मिशनअंतर्गत उभारलेल्या पाण्याच्या टाकीवर चढताना स्लॅब कोसळून दोन विद्यार्थिनींचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. डहाणू तालुक्यातील सुखडआंबा गावातील शिरसोन पाडा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थिनी बरोबर घडलेल्या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. जिल्हा परिषद शाळेच्या पासून काही अंतरावर असलेल्या सुमारे ३० फूट उंचीच्या पाण्याच्या टाकीवर शालेय विद्यार्थी चढले होते. सायंकाळी ४:३० च्या सुमारास या टाकीच्या बांधकामावरील काही भाग कोसळल्याने हा अपघात घडल्याचे सांगण्यात येते.

या अपघातामधील जखमींना सायवन प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रथम नेण्यात आले होते. त्या ठिकाणाहून त्याला कासा उपजिल्हा रुग्णालयात आणले असता दोन मुलींचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. हर्षला रघू पागी (११), इयत्ता सहावी आणि शिरसन संजना प्रकाश राव (१२), इयत्ता सातवी अशी असून रीना रशू फरारा (११) ही सहावीतील विद्यार्थिनी गंभीर जखमी आहे.

जल जीवन मिशन प्रकल्पाचे काम ठेकेदार हरेश बोअरवेल यांच्याकडे होते. मात्र, या कामात हलगर्जीपणा झाल्याचे आरोप ग्रामस्थांनी केले असून पाण्याच्या टाकी उभारणीच्या कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचे उघड झाले आहे.

चळणी सुकडआंबा ग्रुप ग्रामपंचायत सरपंच सरिता भोईं ग्रुप व ग्रामस्थांनी यांनी या घटना संदर्भात सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून या दोषी ठेकेदार, संबधित पाणी पुरवठा विभागाचे अभियंता यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

# ठाणे महापालिकेत शिवजयंती उत्साहात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणेः** ठाणे महानगरपालिकेतर्फे सोमवार, १७ मार्च रोजी तिथीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने, मासुंदा तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मिरवणूक काढण्यात आली. शिवजयंतीनिमित्त ठाणे महापालिकेच्या वतीने तलावपाळी, टेंभी नाका, कोर्ट नाका, स्टेशन रस्ता, सिद्धिविनायक मंदिर, रंगो बापूजी गुप्ते चौक या मार्गावर मिरवणूक काढण्यात आली.

सर्वप्रथम, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी यांनी मासुंदा तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर, पालखीत विराजमान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस वंदन करून मिरवणुकीस प्रारंभ झाला. या मिरवणुकीत, घोडेस्वार, लेझीम पथक, शिवकालीन खेळाचे प्रात्यक्षिक दाखवणारी पथके, बॅण्ड आदीचा समावेश होता. मिरवणुकीदरम्यान, माजी उपमहापौर पल्लवी कदम, माजी नगरसेवक पवन कदम, माजी नगरसेवक सुधीर कोकाटे, उपायुक्त शंकर पाटोळे, सहाय्यक आयुक्त सोपान भाईक आदी उत्सवात सहभागी झाले.

शिवजयंती उत्सवाच्या निमित्ताने, ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्याप्रसंगी, माजी नगरसेवक संजय वाघुले, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, उपायुक्त मिनल पालांडे, विधी अधिकारी मकरंद काळे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.


**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

**उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग**

**-: नोटीस :-**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | उप विभागीय अभियंता, सा.बां., उप विभाग क्र. १, कल्याण | घरडा सर्कल ते टाटा पॉवर (कल्याण-शिळ रोड) | ०४ | सिमेंट कॉक्रिट रस्त्याचे बांधकामात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत.

तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

*जावक क्रमांक :-
कडोंमपा/जसवि/मुका/२९१
दि. १८/०३/२०२५

सही/-
(संजय जाधव)
वृक्ष अधिकारी, वृक्ष प्राधिकरण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

# खासगी आस्थापनात विशाखा समिती बंधनकारक - मंत्री आदिती तटकरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये विशाखा समिती स्थापन करण्यात आली आहे. खासगी आस्थापनात विशाखा समिती स्थापन करणे बंधनकारक करून विविध स्तरांवर आढावा घेतला जाईल असे महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत सांगितले. सदस्य चित्रा वाघ यांनी विशाखा समिती संबंधित उपस्थितीत केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना त्या बोलत होत्या.महिला व बालविकास मंत्री तटकरे म्हणाल्या, राज्यातील काही खासगी आस्थापनात विशाखा समिती स्थापन करण्यात आलेल्या नाहीत. या समित्या स्थापन करण्यासाठी विविध स्तरांवर आढावा घेतला जाईल. विशाखा समिती स्थापन करण्यासाठी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. विशाखा समितीत येणाऱ्या तक्रारींचा निपटारा जलद गतीने करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

राज्य शासनाने महिलांच्या कार्यस्थळी सुरक्षिततेसाठी ठोस पावले उचलत विविध आस्थापनांमध्ये तक्रार समिती तसेच जिल्हास्तरीय स्थानिक तक्रार समित्या स्थापन करण्याचे आदेश दिले असल्याचे तटकरे यांनी सांगितले.

## संक्षिप्त

### राज्यात २१६.६१ कोटी रुपयांची प्रलंबित मजुरी अदा

#### - मंत्री भरत गोगावले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यात प्रलंबित असणारी रोजगार हमीची २१६.६१ कोटी रुपयांची मजुरी अदा करण्यात आल्याची माहिती रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य उमा खापरे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना रोहयो मंत्री गोगावले बोलत होते. यावेळी सदस्य एकनाथ खडसे यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

रोहयो मंत्री श्री. गोगावले म्हणाले की, १०० दिवसांपर्यंतची मजुरी राज्य शासनाच्या निधीतून दिली जाते. राज्य शासनाच्या निधीतून दिली जाणारी मजूरी १०० टक्के अदा करण्यात आली आहे. तर शंभर दिवसांच्या वरील मजुरी ही केंद्र सरकारकडून आलेल्या निधीतून देण्यात येते. अद्यापपर्यंत केंद्र सरकारचा निधी प्राप्त झाला नाही. त्यामुळे उर्वरित मजुरी राज्य शासनाच्या निधीतून देऊन केंद्र सरकारचा निधी आल्यानंतर तो राज्य शासनाकडे वर्ग करण्याच्या पर्यायाविषयी विभाग विचार करत असल्याची माहितीही रोहयो मंत्री गोगावले यांनी यावेळी दिली.

### सोयाबीन खरेदीसाठी केंद्राकडे मुदतवाढीची मागणी

#### - पणन मंत्री जयकुमार रावल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्य सरकारने मागील वर्षात देशात इतर राज्यांच्या तुलनेत ११.२१ लाख मेट्रिक टन इतकी सर्वाधिक खरेदी केली आहे. अजूनही सोयाबीन शिल्लक असल्याने केंद्र सरकारकडे मुदतवाढ मागितली असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधान परिषदेत दिली.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी नियम ९३ अन्वये मांडलेल्या सूचनेवर उत्तर देताना पणन मंत्री श्री.रावल यांनी महाराष्ट्रातील सोयाबीन खरेदीची सद्यस्थिती मांडली.

पणन मंत्री श्री.रावल म्हणाले, राज्यात केंद्र सरकारच्या माध्यमातून ५६२ केंद्रांवर सोयाबीन खरेदी करण्यात आली. यासाठी राज्यभरात ७१० गोदामांची व्यवस्था करण्यात आली होती. आता सर्व गोदाम भरलेले असून सोयाबीन थेट वापरले जाणारे उत्पादन नसल्याने आणि प्रक्रिया केंद्रांची आवश्यकता असल्याने अडचणी निर्माण होत आहेत. याचबरोबर तूर, कापूस आदी उत्पादनांची खरेदी सुद्धा सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केलं.

हमी भावापेक्षा कमी दराने बाजारात सोयाबीन करणाऱ्या व्यापाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात येईल. बाजारातील संतुलन राखणे गरजेचे असून हा विषय अत्यंत संवेदनशील असल्याने निर्णय घेताना विचारपूर्वक पावले उचलली जातील, असे श्री.रावल यांनी यावेळी सांगितले.

राज्यात विक्रमी उत्पादन झाल्यामुळे खरेदीसाठी अजूनही उपाययोजना आवश्यक असून, शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी केंद्र सरकारकडे मुदतवाढीच्या मागणीद्वारे राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### यंदा ४ हजार मेट्रिक टन आंबा विदेशात



नवी मुंबई : वाशीतील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या प्रमुख निर्यात सुविधा केंद्रांवरून परदेशात आंबा निर्यातीस एप्रिल महिन्यापासून सुरुवात होणार आहे. त्या अनुषंगाने आंबा निर्यात करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियांसाठी लागणाऱ्या सर्व सोयी-सुविधा सुसज्ज आहेत. यंदा चार हजार मेट्रिक टन आंबा निर्यात करण्याचे उद्दिष्ट निश्चित केल्याची माहिती मंडळाने दिली.

# मनपासह ग्रामीण भागातील क्रीडा क्षेत्राचा विकास हेच ध्येय

## - प्रमोद वाघमोडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : ठाणे जिल्ह्याच्या भौगोलिक विस्तारात 8 तालुके व 6 महानगरपालिका असून शालेय क्रीडा स्पर्धांसाठी तालुक्यांना ग्रामीण स्पर्धा व महानगरपालिकांना जिल्हा स्पर्धांचा दर्जा आहे. त्यामुळे खेळाडू हा केंद्रबिंदू मानून क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत ठाणे जिल्हा क्रीडाधिकारी तसेच महानगरपालिका क्रीडा अधिकारी यांना शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनात सहकार्य करणे. तसेच क्रीडा शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी सहकार्य करणे. शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये अनुदानित व विनाअनुदानित खेळ घेतले जातात. ठाणे जिल्ह्यातील सर्व क्रीडा प्रकारांच्या जिल्हा स्पर्धा आयोजनात सुसूत्रता आणण्यासाठी ठाणे जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ प्राधान्याने लक्ष देणार आहे. या दृष्टीने ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुके व महानगरपालिका क्षेत्रांतील क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षकांना संघटित करुन क्रीडा विकास करणे हे ध्येय आहे असे कार्यकारणीच्या सभामध्ये मार्गदर्शन करताना प्रमोद वाघमोडे यांनी सांगितले.

ठाणे मनपा क्षेत्र क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक संघटना पहिली कार्यकारणी सभा ठाणे जिल्हा अथलेटिक संघटनेचे कार्यालय दादोजी कोंडदेव स्टेडियम, ठाणे येथे जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे अध्यक्ष प्रमोद वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली व ठाणे मनपा क्षेत्र क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेचे अध्यक्ष रंजीत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये ठाणे मनपा कार्यकारणी तर्फे ठाणे जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघावर निवडलेले नवनिर्वाचित अध्यक्ष प्रमोद वाघमोडे तसेच कार्यालयीन सचिव राजेंद्र पवार, संघटक पांडुरंग ठोंबरे यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ येणाऱ्या काळात जास्तीत जास्त क्रीडा शिक्षक बांधवांना एकत्र करणे व त्यांचं मनोबल वाढवणे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विषयाबद्दल शिक्षकांचे मनोबल व सक्रियता वाढवण्यासाठी जास्तीत जास्त कार्यशाळांचे आयोजन नियोजन करणे. पवित्र पोर्टल बाबत विचारविनिमय करून सदर बाबतची दिशा निश्चित करणे. पहिली ते आठवीसाठी शाळांमध्ये कायमस्वरूपी क्रीडा शिक्षक नियुक्तीसाठी पुन्हा प्रयत्न करणे. आजच्या युगातील विद्यार्थी व त्यांचे दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या नवनवीन सामाजिक माध्यमांचे आकर्षण व अन्य समस्या शिक्षकांनी कशा हाताळल्या पाहिजे यासाठी मार्गदर्शन, शिबिरे व चर्चासत्रांचे आयोजन करण्यासाठी ऑफलाइन/ऑनलाईन बैठक घेणे व दिशा ठरवणे. कौतुकास्पद कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या पाठीशी उभे राहणे व त्यांनी केलेल्या कार्याचे कौतुक करणे, त्या संदर्भात वार्षिक पुरस्काराबाबत तालुका जिल्हा राज्य असे स्तर ठरवणे. प्रत्येक तालुक्यातील, प्रत्येक महानगरपालिकेतील राष्ट्रीय खेळाडूंचा तसेच राज्य पातळी खेळाडूंचा तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार सोहळा आयोजित करणे प्रोत्साहन देणे. विविध खेळांच्या एकविध संघटनांच्या तसेच, शिक्षणाधिकारी व जिल्हा क्रीडाधिकारी यांच्या क्रीडा शिक्षकांना नवनवीन खेळाची माहिती देणे व प्रशिक्षण नियोजन करणे. जिल्ह्याप्रमाणे मनपा क्षेत्रात ही महिला क्रीडा शिक्षकांचे स्वतंत्र युनिट उभा करावे. त्याचबरोबर ठाणे महानगरपालिका संघटनेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून इतरही महानगरपालिका क्षेत्रातील व सर्व तालुक्यांतील क्रीडा शिक्षकांनी एकत्र येऊन संघटनेची बांधणी करावी व एकजुटीने कार्यास सुरुवात करावी अशा विविध विषयावर चर्चा करून ध्येय निश्चित करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाची ठाणे जिल्हा संलग्न ठाणे महानगरपालिका क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनाचे अध्यक्ष रणजीत शिंदे, सचिवडॉ. एकनाथ सोपान पवळे, कोषाध्यक्ष मो. जुबेर मो. आसिफ बक्षी, कार्याध्यक्ष प्रमोद धोंडीराम वाघमोडे, उपाध्यक्ष पांडुरंग ठोंबरे, उपाध्यक्ष राजेंद्र सखाराम पवार,सहसचिव नामदेव गणपती पाटील, संघटक प्रतिमा मंगेश महाडिक,सदस्य रोहिणी विजयकुमार डोंबे,विशाखा विठ्ठल आर्डेकर, निलेश काशीराम वळवी, मोहसिन सराजूलइस्लाम शेख,मयुरेश चंद्रशेखर शिर्के उपस्थित होते.

# रेशनिंग तांदूळ गैरव्यवहाराची सखोल चौकशी सुरु

## - राज्यमंत्री योगेश कदम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जालना जिल्ह्यातील माजलगाव येथून नागपूर येथे जाणारा ३० टन रेशनचा तांदूळ पोलिसांनी ट्रकसह जप्त केला. या जप्त मालासंदर्भात जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या घटनेची सखोल चौकशी सुरु असून यातील दोषींवर कारवाई केली जाईल, असे राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

सदस्य विजय वडेट्टीवार यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता.गृह राज्य मंत्री श्री. कदम म्हणाले, जिल्हाधिकारी जालना यांनी याबाबत संबंधितास कारणे दाखवा नोटीस बजावली असून त्यांच्याकडे याबाबत सुनावणी सुरू आहे. रेशनिंग तांदळामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत पुरवठा उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून तीन महिन्यात समितीकडून अहवाल मागविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# जिल्हा प्रशासनाद्वारे शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रसिद्धी मोहीम सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण ठाणे जिल्ह्यात जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त समाधान इंगळे व जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांच्या पुढाकारातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार-प्रसिद्धी विविध माध्यमांद्वारे सुरु करण्यात आली आहे.

यानुषंगाने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्याकरिता आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनात माहिती फलकांद्वारे शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली असून या प्रदर्शनाला जिल्हाधिकारी कार्यालयात येणाऱ्या सामान्य नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप, जिल्हाधिकारी महोदयांचे स्वीय सहाय्यक गिरीष काळे, निवृत्त उपअभियंता मोहन पवार, निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी रणवीरसिंह राजपूत, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे म्हणाले की, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालय यांच्या विविध कामांपैकी प्रामुख्याने करावयाचे काम म्हणजे केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचविणे. यामध्ये ठाणे जिल्हा माहिती कार्यालय निश्चितपणे अग्रेसर आहे. आज या प्रदर्शनाच्या माध्यमातून त्यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणारे स्टॅन्डीजचे प्रदर्शन भरविले आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसिद्धीचे काम आणखी वेगाने व प्रभावीपणे होणार आहे. समाजातील प्रत्येक वर्गासाठी, जसे की शेतकरी, महिला, कामगार, विद्यार्थी व मुलींसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा एकत्रितपणे गोषवारा तयार करून एका विशिष्ट दिवशी त्या सर्व योजनांची प्रसिद्धी करणे हे उद्दिष्ट त्यांनी ठेवले आहे.

या नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून आपल्याला जनतेपर्यंत केंद्र व राज्य शासनाच्या योजना पोहोचविण्यामध्ये निश्चितपणे यश मिळेल. या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचतील व प्रभावी अंमलबजावणी करता येऊ शकेल, असे सांगून ते पुढे म्हणाले की, जनतेच्या सहभागाशिवाय आणि सहकार्याशिवाय कोणतीही योजना यशस्वी होऊ शकत नाही. योजनेमध्ये किंवा त्याच्या अंमलबजावणीमध्ये जनतेचा सकारात्मक प्रतिसाद आम्हाला अपेक्षित आहे आणि तो निश्चितपणे मिळेल याची मला खात्री आहे.

प्रदर्शन, डिजिटल वॉलद्वारे प्रसिद्धी, क्यू आर कोड, शासकीय योजना चित्रफिती व सोशल मिडीया प्रसिद्धी, व्हिडिओ क्रिएटिव्ह, जिल्ह्यातील तलावांवरील चित्रफिती, मोबाईल स्टॅन्डद्वारे प्रसिद्धी, मोबाईल व्हॅन, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या योजनांची सोशल मिडियाद्वारे प्रसिद्धी अशा विविध माध्यमांद्वारे शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार-प्रसिद्धी करण्यात येत असून जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# टोकावडे वनखात्याच्या अखत्यारीतील वैशाखरे गावाजवळ वणव्याने जंगल भस्मसात



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : टोकावडे वनखात्याच्या परिक्षेत्रापासुन हाकेच्या अंतरावर असलेल्या वैशाखरे गावाजवळील जंगलात भरदुपारी वणवा लागल्याने घनदाट जंगल भस्मसात झाले वैशिष्ट्य म्हणजे वणवा विझविण्यासाठी वनखात्याकडे यंत्रणा असुन सुद्धा आशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असुन वनखात्याने वणव्याकडे दुर्लक्ष केले तर भविष्यात टोकावडे, वैशाखरे परिसरातील घनदाट जंगले नष्ट होण्यास फारसा वेळ लागणार नाही खेदजनक बाब आहे. टोकावडे वनखात्याच्या परिक्षेत्रातील एकलहरे भागात मुंबईतील धनदांडग्यांनी जमीनी खरेदी करुन त्या जमिनीवर असलेली मोठमोठी झाडे वनखात्याची रीतसर परवानगी न घेता मुळासकट झाडे उखडून टाकली असल्याने संपूर्ण परीसर रखरखीत वाळवंट झाले असल्याचे दिसून येत आहे. त्याचाच परिणाम म्हणून वन्यजीव मानवी वस्तीकडे धाव घेताना निदर्शनास येत असुन वनखात्याच्या दुर्लक्षित पणामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जात नसल्याची खंत पर्यावरण प्रेमी व्यक्त करीत आहेत.

# भुवन गावात शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता





मुरबाड : अखंड हिंदुस्थानचे स्फूर्ति स्थान, महाराष्ट्राचा स्वाभिमान, जनमाणसांच्या हृदयसिंहासनावर अधिराज्य गाजवणारे महाराष्ट्राचे आराध्य दैवत,हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची तिथी नुसार जन्मोत्सव सोहळा संपूर्ण महाराष्ट्रात धुमधडाक्यात साजरा होत असतो. मुरबाड तालुक्यातही ठिकाणी शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला. भुवन येथिल राजमुद्रा प्रतिष्ठानच्या वतीने गेली 11 वर्ष तिथी नुसार शिवजयंती साजरी केली जाते. यावर्षी आज सकाळी 11.वा. छत्रपतींच्या मुर्ती ची प्राण प्रतिष्ठा करण्यात आली. तद्नंतर मुली व महिलांसाठी रांगोळी स्पर्धा ठेवण्यात आली होती. संध्याकाळी छत्रपतींचा भव्य पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता या पालखी सोहळयात गावातील शिवप्रेमींनी ऐतिहासिक पोषाखात छत्रपतींच्यासह सरदार व मावळयांचे विविध रूपे सादर केली होती. सर्व शिवप्रेमी नागरिक, तरूण, महिला, आबालवृद्ध सहभागी झाले होते. संगित भजन व पोवाड्यांनी गाव दुमदुमून निघाला होता.रात्री प्रतिष्ठानच्या वतीने मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण गावात महिलांनी घरासमोर सडा रांगोळया काढल्या असून दिवसभर चालणार्या या भरगच्च कार्यक्रमामुळे गावात शिवमय वातावरण पाहायला मिळाले.

# नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना निधी वितरीत

## - मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : राज्यात विविध नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते. या नुकसान भरपाईसाठी यंदाच्या वर्षी आतापर्यंत १२ हजार २६२ कोटींचा निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच १३ हजार ३६१ कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी आज विधानपरिषदेमध्ये दिली.

सदस्य परिणय फुके यांनी याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री पाटील बोलत होते. यावेळी विरोधीपक्ष नेते आंबादास दानवे, सदस्य प्रविण दरेकर, सदाभाऊ खोत यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

मंत्री श्री. पाटील म्हणाले की, विभागाच्या शंभर दिवसांच्या नियोजनामध्ये नुकसान भरपाईची रक्कम १०० टक्के वितरीत करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यात अनेक शेतकऱ्यांची बँक खाती ही आधार संलग्न नाहीत, तसेच ई केवायसीही शिल्लक आहेत. यासर्व गोष्टी युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी आधार संलग्न बँक खाती नसलेल्या शेतकऱ्यांची यादी, ई केवायसी नसलेल्या खात्यांची माहिती चावडीच्या ठिकाणी प्रसिद्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही कामे पूर्ण झाल्यानंतर उर्वरित नुकसान भरपाईचे वितरणही तातडीने करण्यात येईल. कोणत्याही नुकसानग्रस्त शेतकऱ्याची भरपाईची रक्कम शिल्लक राहणार नाही, असेही मंत्री पाटील यांनी सभागृहात सांगितले.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024